प्रति,
माननीय संचालक,
राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र सोलापुर.

विषय - सोलापुर लाल वाणाबद्दल अनुभव

महोदय,

वरील विषयास अनुसरून मी केशव रमेश गायकवाड रा. माळेगाव, ता. माढा, जि. सोलापुर, महाराष्ट्र. मी सोलापुर लाल रोपे लावल्यानंतर मला सोलापुर लाल वाणाविषयी सांगावस वाटत की, मी लागवड केल्यापासुन ता - 1 मार्च 2019 पहिले चार महिने फक्त झाडांना गरजेनुसार पाणी दिले. कोणतेही फवारणी घेतली नाही. किंवा औषधे सोडली नाहीत. चार महिने पुर्ण झाल्यानंतर 5 ऑगस्टला पहिली छाटणी केली. व मेसळ डोस रिंग पद्धतीने टाकुन त्यामध्ये 500 झाडांसाठी युरिया - 1 पोते, पोटॅश - 1 पोते, DAP - 1 पोते, मायक्रो न्युट्रं - 10 kg. असा रिंग डोस केला. रिंग डोस केल्यानंतर झाडांची ग्रोथ व वाढ व डेरेदार पणा चांगला वाढला. पुन्हा दुसरी छाटणी 15 डिसेंबर 2019 ला केली व प्रति झाडास दोन पाटी शेणखत व प्रति झाड 500g मेसळ डोस, व प्रति झाड 1 kg निंबोळी टाकुन झाडांच्या खोडांना ट्रॅक्टरने माती लावुन घेतली. व 1 जानेवारी 2020 ला पाणी बंद केले. व बाग ताणावर सोडली बाग ताणावर सोडल्यापासुन 1946, 05234, 6BA बोरॉन या निंमोती काळात फवारणी घेतल्या शंभर दिवस झाडांना विश्रांती दिली. तरीसुद्धा मनावी अशी पानगळ झाली नाही म्हणुन 1 लीटर पाण्यासाठी 5 मिली इथ्रेल व 3g थायुरिया फवारणी घेतली. हि फवारणी घेवुनसुद्धा बऱ्यापैकी पानगळ झाली नव्हती म्हणुन पुन्हा आठवड्याने प्रति लीटर 3 मिली इथ्रेल व 3 ग्रॅम थायुरिया फवारणी घेतली व 90% पानगळ झाली.

पुढील पानावर ......



Shubham

Page No.:
Date :

पाणगळ झाल्यानंतर लगेच रासायनिक खतांचा भेसळ डोस प्रति झाड 1 kg व 2 पाटी शेणखत प्रति रोपास व 5 मेला पहिले पाणी सोडले. पहिल्या पाण्याबरोबर 5 L मायक्रोन्युट्रन दिले. 22 मे ला प्रत्येक झाडाला 300 ते 350 कळी लागली. कळी लागल्यानंतर 1 जुनपासुन दररोज पावसाला सुरूवात झाली. रिमझिम पाऊस महिनाभर चालला त्यामुळे खालुन कोणतेही खते सोडली नाहीत.

तरीसुद्धा प्रत्येक झाडाला 200 ते 300 फळे सेटिंग झाली. सेटिंग झालेली फळे 1 महिना पाऊस असुन अत्यल्प प्रमाणात रोगाचा प्रादुर्भाव जाणवला. डांबच्या, खरड्या, तेल्या, कुजवा हे कोणतेही रोग 1 महिना पाऊस चालु असुन फळांवरती आला नाही. आळवण्याला बुरशीनाशक व किटकनाशक फवारण्या केल्या. मला यावुन असं जाणवलं एवढा पाऊस असुनसुद्धा फळांची गळती झाली नाही, फुलांची 10% प्रमाणात गळती झाली. याच वातावरणामध्ये माझ्या जवळील भगव्याच्या बागा डांबच्या, तेल्या, खरड्या, कुजवा या रोगांच्या प्रादुर्भावामुळे गेल्या. भगव्या वाणाची ज्या शेतकऱ्यांची बाग आहे, ते ~~प्लॉटवर~~ सोलापुर लाल प्लॉटवर आल्यानंतर त्यांच शेतकऱ्यांची मते असे आले की, आमच्या बागेवरती एवढा डांबच्या, खरड्या, तेल्या कुजवा आला असुन तुमच्या बागेवरती या रोगांचा प्रादुर्भाव कसा काय दिसत नाही.

त्यांची मते अशी आली की सोलापुर लाल या वाणाच्या झाडांची रोग प्रतिकार शक्ती चांगली आहे व झाडांची फळ सेटिंग चांगली आहे. एवढी 200 ते 300 फळ सेटिंग पहिल्या वर्षी होत नाहि. व कोणत्याहि फवारण्या फळ सेटिंगसाठी घेतल्या नाहीत. तरीदेखील 200 ते 300 फळ सेटिंग झाली. सेटिंग झाल्यानंतर प्रत्येक झाडावरची 100 फळे काढुन टाकली. प्रत्येक झाडास 150 ते 200 फळे राहिली. परत 1 महिन्यानंतर प्रत्येक झाडावरती 125 ते 150 फळे ठेवली. भगव्या वाणांची ज्या शेतकऱ्याची बाग आहे ~~त्या~~ ते प्लॉट वरती आल्यानंतर तीन महिन्याची फळे झाली होती. फळांना कलर येवु लागला होता त्यांची मते अशी आली की, फळांना चकाकी व चमक आहे.

पुढील पानावर.... ②

चार महिन्याची फळे आल्यानंतर फळांच्या दाण्यांचा रंग लाल दिसु लागला. व ते दाणे खाल्ल्यानंतर कडकपणा जाणवला. व तेच फळ काढणीला आल्यानंतर दाण्यांचा रंग पुर्ण गडद लाल झाला व दाणे खाण्यासाठी मऊ लागले. त्यात कडकपणा जाणवला नाही. कलर व चमक भगव्या वाणापेक्षा खुप चांगला आहे. तसेच आकार छोटा असलेल्या फळांचा वजनदारपणा जास्त आहे.

यावरुन मला असा अनुभव आला कि, भगव्या वाणापेक्षा सोलापुर लाल हा वाण चांगला आहे. थोडी साईज घेण्यासाठी सोलापुर लाल त्रासदायक ठरतोय. पण तरीदेखील प्रति फळ 500 g निर्यातीसाठी कोणतेही अडचण येणार नाही असे मला वाटते. भगव्यापेक्षा थोडी सोलापुर लाल या वाणाची साईज कमीच राहणार असे मला वाटते कारण भगव्यापेक्षा सोलापुर लाल या वाणाची फळे 1 महिना अगोदर काढणीस येतात. सोलापुर लालची भगव्यापेक्षा साल भगव्यापेक्षा जाड आहे. व झाडाची पाने मोठी आहेत. व झाडाचा आकारमान मोठा आहे. व पीन होल बोरर सोलापुर लाल मध्ये येणार नाही असे माझे वैयक्तिक मत आहे. तसेच झाडात मजबुतपणा, काटकपणा जास्त आहे. त्यामुळे फळांचा बोजा पेलतो. फळांची साल जाड असल्यामुळे तेलकट व डागाचे प्रमाण कमी येते. असे माझे मत आहे. काट्यांची संख्या जास्त असल्यामुळे फुलधारणा सेटिंग जास्त होते.

आपला विश्वासू
केशव रमेश गायकवाड



Shubham